अॅलॉटमेंट लेटर

प्रति,

विषयः- मौजे- वडाळा, ता. जि. नासिक येथील नासिक महानगरपालिका हद्दीतील स्थावर मिळकत यांसी सर्व्हे नंबर २९/४/३+४+५+६ प्लॉट नंबर २६ व २७ याचे क्षेत्र ५६३.७५ चौरस मिटर वरील **न्यू शिव शुभम** या प्रकल्पा मधील सदनिका क्रमांक ------- याचे अॅलॉटमेंट बाबत..

महोदय.

१. आम्ही मौजे- वडाळा, ता. जि. नासिक येथील सर्व्हे नंबर २९/४/३+४+५+६ प्लॉट नंबर २६ व २७ याचे क्षेत्र ५६३.७५ चौरस मिटर वरील **न्यू शिव शुभम** नांवाने प्रकल्प राबवीत असून सदरहु प्रकल्पाचे ठिकाणी तुम्ही प्रत्यक्ष येऊन प्रकल्पाची पाहणी केलेली असून त्यानुसार तुम्ही सदरहू प्रकल्पा मधील खालील नमूद मिळकतीचे अॅलाटमेंट संदर्भाने विनंती केलेली आहे. त्यानुसार तुम्हांस सर्व अटी व शर्ती तसेच प्रकल्पाची संपूर्ण माहिती दिलेली असून त्या सर्व बाबी तुम्ही मान्य व कबुल केलेल्या असल्याने तुमचे लाभात सदरचे अॅलॉटमेंट लेटर देण्यांत आलेले आहे.

२. तुम्ही दिलेल्या माहितीनुसार अॅलॉटमेंट करण्यांत आलेल्या व्यक्तींची नांवे व तुम्हांस अॅलॉट केलेल्या सदनिकेचा तपशिल.

ए. नांव ----------

बी. पत्ता ----------

सी. पॅन ----------

डी. अॅलॉटमेंट सदनिकेचा क्र. ----------

इ. क्षेत्र ----------

एफ. पार्कींग ----------

जी. मजला ----------

एच. विंग ----------

आय. प्रकल्पाचे नांव- **न्यू शिव शुभम**

जे. शिवार वडाळा

के. सर्व्हे नंबर २९/४/३+४+५+६

एल. प्लॉट नंबर २६ व २७

एम. किंमत

एन. रेरा नोंदणी क्रमांक

३. वर नमूद सदनिका तुम्हांस किंमत रुपये ---------- ठरवून ॲलॉट करण्यांत आलेली असून सदनिके करीता पार्कींग क्षेत्राची किंमत ---------- कायम करण्यांत आलेली आहे, अशी एकूण किंमत रक्कम रुपये ---------- मात्र कायम करण्यांत आलेली आहे.

सदर किंतमीपैक्की रक्कम रुपये ---------- मात्र तुम्ही आम्हांस -- ---------- बॅन्क येथील चेक क्रमांक ---------- दिनांक ---------- रोजीचे चेक स्वरुपात विसार/ आगाऊ रक्कम म्हणून अदा केलेली आहे. त्याबाबत कोणतीही तक्रार नाही. (एकूण किंमतीच्या १० टक्के रक्कम).

४. सदर किंमतीचे रक्कमेमध्ये खालील बाबींच्या रक्कमा समाविष्ट नसून त्या तुम्ही किंमती व्यतिरीक्त वेगळया दयावयाच्या आहेत ही बाब तुम्ही मान्य व कबुल केलेली आहे.

अ) मिळकती संदर्भात दस्त नोंदणीकामी होणारा स्टॅम्प डयुटी, नोंदणी फी व इतर खर्च.

ब) नळ कनेक्शनचा खर्च

क) विद्युत कनेक्शनचा खर्च

ड) सोसायटी किंवा संघ नोंदणी खर्च, प्रवेश फी व इतर खर्च

इ) बांधकाम संदर्भाने व चालू कामा संदर्भाने लागु असलेले सर्व कर जसे की, जी.एस.टी व इतर कर, उपकर तसेच भविष्यात बांधकाम चालू असे पावेतो व त्यानंतरही जे कोणतेही कर लागू होतील ते कर.

५. सदरचे जमीन मिळकती संदर्भाने लिहून देणार यांचे मालकी हक्क दर्शविणारी व मिळकतीचे टायटल संदर्भाने असलेली संपूर्ण कागदपत्रे जसे की ७/१२ उतारे, नोंदी, खरेदीखते व इतर दस्तऐवजे तसेच लिहून देणार यांनी नियुक्त केलेल्या वास्तुशास्त्रज्ञ व स्थापत्य अभियंता यांनी तयार केलेले आराखडे, इमारत

नकाशे व इतर नकाशे तसेच स्थावर संपदा (विनियमन व विकास) अधिनियम २०१६ यामध्ये नमूद कागदपत्र यांच्या प्रती लिहून घेणार यांना निरीक्षणासाठी व अवलोकनाकामी यापुर्वीच दिलेल्या आहेत. त्यानुसार लिहून घेणार यांनी सदरील कागदपत्रांची तपासणी लिहून घेणार यांनी केलेली असून लिहून घेणार यांची खात्री पटलेनंतरच लिहून घेणार यांनी मिळकत खरेदी करण्याचे ठरविले आहे. तसेच सदरची सर्व कागदपत्रे सदैव प्रकल्पाचे ठिकाणी उपलब्ध ठेवलेली आहेत. तसेच इमारत नकाशा हा नासिक महानगरपालिका नासिक यांनी पत्र क्रमांक- एलएनडी/ बीपी/ए-४/२४९/३३०५/१३ दिनांक २९/१०/२०१३ अन्वये मंजूर केलेला आहे. सदर इमारत नकाशा मध्ये फेरबदल करणे, वाणीव बांधकामा कामी तुम्ही आम्हांस संमती दिलेली आहे.

६. सदरहू सदनिकेची व पार्कींग क्षेत्राची एकूण किंमत रक्कम रुपये ---------- ------- (अक्षरी रुपये ---------- मात्र) कायम करण्यांत आलेली असून सदरहू रक्कमेपैकी रक्कम रुपये ---------- (अक्षरी रुपये ---------- ---------- मात्र) एकूण किंमतीच्या १० टक्के रक्कम) तुम्ही आम्हांस ---------- ---------- बॅन्क येथील चेक नंबर ---------- दिनांक / / रोजीचे चेक स्वरुपात विसार/ आगाऊ रक्कम म्हणून अदा केलेली आहे. त्याबाबत कोणतीही तक्रार नाही. त्यानुसार शिल्लक व उर्वरीत किंमतीची रक्कम रुपये --------- ---------- तुम्ही आम्हांस खालील नमूद टप्प्याटप्प्याने अदा करण्याचे मान्य व कबुल केलेले आहे त्याचा तपशिल पुढील प्रमाणे.

अ.क्र.	रक्कम	तपशिल
१.	---------- (९५ टक्के)	एवढी रक्कम लिहून घेणार यांनी लिहून देणार यांना आजपासून ३० दिवसांचे आंत अदा करावयाचे आहेत.
२.	----------(५ टक्के)	एवढी रक्कम लिहून घेणार यांनी लिहून देणार यांना उक्त इमारतीचे भोगवटा प्रमाणपत्र प्राप्त होऊन कब्जा लिहून घेणार यांनी स्विकारण्या संदर्भाने लिहून देणार यांनी लिहून घेणार यांना लेखी कळविल्याचे दिनांकापासून १० दिवसांचे आंत अदा करावयाचे आहेत.

७. सदर रक्कमा वर नमूद केल्यानुसार वेळचेवेळी तुम्ही आम्हांस अदा करावयाची आहे ही महत्वाची अट व शर्त आहे. जर सदर रक्कमा तुम्ही आम्हांस अदा करण्यास विलंब झाल्यास, सदर ॲलॉटमेंट रद्द करण्याचे आमचे हक्कास बाधा न येता सदर देय रक्कमेस विलंबाचे संपूर्ण कालावधी करीता ------- टक्के द.सा.द.शे. व्याज आकारण्यात येईल व त्यानुसार तुम्ही व्याजासह रक्कमा आम्हांस अदा करावयाच्या आहेत.

८. वर नमूद केल्यानुसार तुम्ही आम्हांस रक्कमा देण्यास विलंब केल्यास विलंबाचे संदर्भाने व्याजासह रक्कम देण्याचे आम्ही तुम्हांस कळविल्याचे दिनांका पासून १५ दिवसांचे आंत तुम्ही सदर देय रक्कम व व्याजाची रक्कम अदा न केल्यास सदर ॲलॉटमेंट एकतर्फे व आपोआप रद्द होईल व त्यानंतर सदर मिळकत कोणत्याही त्रयस्थ खरेदीखतास ॲलॉट करण्यात येईल त्यावर तुम्हांस हरकत घेण्याचा कोणताही हक्क राहणार नाही. तसेच अशावेळी तुमची ॲलॉटमेंट रद्द झाल्यास त्यावेळी पावेतो तुमचेकडून आम्हांस प्राप्त झालेल्या संपूर्ण रक्कमे मधून १० टक्के रक्कम कपात करुन उर्वरीत रक्कम बिनव्याजी परत करण्यांत येईल तसेच करापोटी तुम्ही कोणतीही रक्कम दिलेली असल्यास व ती आम्ही शासन जमा केलेली असल्यास अगर करावी लागत असल्यास ती तुम्हांस परत करण्यात येणार नाही अगर तुमचेवतीने आम्ही कोणताही कर भरलेला असल्यास ती रक्कम देखिल कपात करुन उर्वरीत रक्कम बिनव्याजी परत करण्यात येईल तसेच करापोटी तुम्ही कोणतीही रक्कम दिलेली असल्यास व ती आम्ही शासनजमा केलेली असल्यास अगर करावी लागत असल्यास ती तुम्हांस परत करण्यात येणार नाही अगर तुमचेवतीने आम्ही कोणताही कर भरलेला असल्यास ती रक्कम देखिल कपात करुन उर्वरीत रक्कम बिनव्याजी परत करण्यात येईल.

९. सदर ॲलॉटमेंट लेटरचे दिनांकापासून ३० दिवसांचे आत तुम्ही सदर ॲलॉटेड मिळकती संदर्भाने करारनामा हा दस्त नोंदविण्याची संपूर्ण कार्यवाही तुमचे पदरखर्चाने पूर्ण करुन दस्त नोंदणी करुन देण्याचे मान्य व कबुल केलेले आहे.

१०. सदर तुम्हांस ॲलॉट केलेल्या मिळकतीचे संदर्भाने तुम्ही आम्हांस संपूर्ण किंमतीची रक्कम व इतर देय रक्कमा अदा केल्याशिवाय सदर मिळक्त तुम्ही त्रयस्थ इसमांस विक्री, हस्तांतर, तबदील करण्याचे, गहाण देण्याचे तुम्हांस कोणतेही हक्क व अधिकार राहणार नाही.

११. सदरहू तुम्हांस ॲलॉट करण्यांत आलेल्या मिळकतीचा कब्जा तुम्हांस दिनांक ---------- पावेतो देण्यांत येईल, मात्र सदर कब्जा देण्यास युध्द, नागरी विक्षोभ किंवा दैवी कृती अगर शासनाची, न्यांयालयाची आणि/ किंवा इतर सार्वजनिक अथवा सक्षम प्राधिकरणाची कोणतीही नोटीस, आदेश, नियम अधिसुचना या कारणामुळे अगर शासन/ प्राधिकरणा कडून कोणतीही परवानगी मिळण्यास विलंब या कारणामुळे अगर तुमचे कसुरीमुळे विलंब होऊ शकतो ही बाब तुम्ही मान्य व कबुल केलेली आहे.

१२. सदर ॲलॉटमेंट पोटी तुम्ही आम्हांस दिलेला आगाऊ रक्कमेचा चेक अनादरीत झाल्यास सदरचे ॲलॉटमेंट आपोआप रद्द होईल त्याकामी तुम्हांस कळविण्याची आवश्यकता राहणार नाही.

१३. सदर वर नमूद बाबी तुम्ही मान्य व कबुल केलेल्या असून त्याचे मान्यते करीता सदर ॲलॉटमेंट लेटरवर सही करुन दिलेली आहे.